I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 238-240
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# डिजिटल ग्रंथालय : एक काळाची गरज

डॉ. संजय एस. भुतमवार

ग्रंथपाल
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर

| Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022<br>Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022 |
|---|---|---|

**सारांश :**
आजचे युग हे गतिमान व माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्यामुळे दिवसेदिवस माहिती निर्मितीचा वेग वाढतच आहे. त्यामुळे या वाढणाऱ्या माहितीचा किंवा वाचनसाहित्यांचा त्वरित वाचकांपर्यत पोहचविणे आवश्यक झालेले आहे.आजच्या तंत्रज्ञान युक्त काळात वाचकापर्यत त्वरित माहिती पोहचविण `पारंपारिक ग्रंथालयातुन शक्य होत नाही यावर उपाय म्हणुन डिजिटल गंथ्रालय एक काळाची गरज बनली आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र हे माहिती तंत्रज्ञानाशी संबधित असल्यामुळे`डिजिटल ग्रंथालयाचा विकास हा त्यातील एक प्रगतीचा भाग आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्रामध्ये काम करणाऱ्यापुढे आज माहितीतंत्रज्ञाचे एक मोठे आव्हाण समोर उभे आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आधुनिक ग्रंथालयाचे स्वरुप ह`संगणकीय ग्रंथालये, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये, डिजीटल ग्रंथालये आणि आभासी ग्रंथालये असे झालेले आहे. या बदलामुळे वाचकांना जलदगतीन`वाचनसाहित्य व ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे अपरिहार्य ठरत आहेत. आणि याची परिणीती म्हणजे डिजिटल ग्रंथालयाचा उदय होय.
**बीजशब्द :** पारंपारिक ग्रंथालय, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय, आभासी ग्रंथालय, माहितीतंत्रज्ञान

**प्रस्तावना :**

डिजिटल ग्रंथालय पारंपारिक ग्रंथालयासारखेच असते दोघामध्ये वाचनसाहित्य उपलब्ध करुन देणे हाच एक उदेश असतो. पारंपारिक ग्रंथालयात वाचनसाहित्य हे मुद्रित व दुश्य स्वरुपात असते तर डिजिटल ग्रंथालयात वाचनसाहित्य हे आभासी स्वरुपात असते. ग्रंथालयातील वाचनसाहित्य तयार करित असताना उपयोगात आणल्या जाणाऱ्या वाचनसाहित्याचा मर्यादाचा विचार करुन` डिजिटल ग्रंथालय तयार करावे लागते. याकरिता प्रामुख्याने दोन बाबीचा विचार करावा लागतो.

१) डिजिटल वाचनसाहित्य

२) वाचनसाहित्याचे ऑनलाईन संग्रहण

डिजिटल ग्रंथालया करिता वाचन साहित्या संग्रहित करतांना ;ब्वचलतपहीजद्ध नियमाचे पालन करावे लागते. डिजिटल ग्रंथालयामध्य`सर्वच वाचनसाहित्याचा संग्रह करता येत नाही डिजिटल ग्रंथालयामध्ये वाचनसाहित्य संग्रह करताना काही नियमाचे पालन करावेच लागते त्यामुळ `डिजिटल ग्रंथालय तयार करताना काही आव्हाने येत असतात त्या आव्हानाला समोरे जावून डिजिटल ग्रंथालय तयार करावे हि एक काळाची गरज आहे.

माहितीची क्रांतीहि कृषी व औधोगिक क्रांतीपेक्षा मानवी जीवनाला कलाटणी देणारी आहे. आजच्या युगाात माहिती वाचकापर्यत माहिती तंत्रज्ञानाद्वारे कशा पध्दतीने माहिती पोहचविती यावर त्याची उपयुक्ता व यश अवंलबुन आहे. त्यामुळ `डिजिटल ग्रंथालयाचा उपयोग करणे गरजेचे आहे. आजचे युग हे गतिमान व माहिती तंत्रज्ञानाचा युग असल्यामुळे माहितीची निर्मिती वेगाने होत आहे. पारंपारिक ग्रंथालयेकरिता आलेली वाचनसाहित्य व माहिती तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध वाचनसाहित्या वर प्रक्रिया करुनते साहित्य डिजिटल स्वरुपात तयार करुन ते वाचकापर्यंत पोहचविणे या यंत्रणेला डिजिटल ग्रंथालय असे म्हणता येईल

पारंपारिक वाचनसाहित्य कमी वेळेत वाचकापर्यत उपलब्ध करुन देणे शक्य होत नसते म्हणुन माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन वाचनसाहित्य तात्काळ वाचकापर्यत पोचविणे आवश्यक झालेले होते. त्यावर डिजिटल ग्रंथालय एक पर्याय म्हणुन समोर आलेले आहे. १९९० च्या दशकात इंटरनेट सर्वा पर्यंत पोहचुन त्याची लोकप्रियता वाढली व त्यामध्ये IT Act मुळे खऱ्या अर्थाने डिजीटल ग्रंथालयाची संकल्पना उदयास आली.

**व्याख्या:**

डिजिटल ग्रंथालयातील माहिती किंवा वाचनसाहित्य हे अस्पर्शी असते, प्रत्यक्ष हाताळता येत नाही याचाच अर्थ यातील मजकूर वाचनासाठी तांत्रिक साधनाची किंवा माहिती तंत्रज्ञानाची आवश्यकता असते अशा ग्रंथालयाला डिजिटल ग्रंथालये असे म्हणतात.

डिजिटल ग्रंथालयाच्या ठिकाणी साहित्य संग्रह हा डिजिटल स्वरुपात साठविलेला असते व तो संग्रह नेटवर्कच्या सहाय्याने वापला जातो. स्कॅनरच्या साहाय्याने छापील मजकुर डिजिटल स्वरुपात परावर्तीत करुन तसेच

डेटाबेसच्या साहाय्याने डिजिटल स्वरुपात संग्रहीत करुन इंटरनेटद्वारे पाहता येतात असे ठिकाणम हणजे डिजिटल ग्रंथालय होय.

शास्त्रशुध्द पध्दतीने तयार करुन माहिती तंत्रज्ञानाचा वापरकरुन त्यांची व्यवस्थित मांडणी करुन ते वापरण्यासाठी विविध पध्दतीने व विविध भागानी वापरता येणाऱ्या वाचनसाहित्याचा समावेश असणारे ग्रंथालय म्हणजे डिजिटल ग्रंथालय होय.

कमी खर्चात आधुनिक सुविधासह पारंपारिक ग्रंथालयाना पर्याय म्हणुन डिजिटल ग्रंथालयाकडे बघीतले जाते. डिजिटल ग्रंथालय हे स्थानिक साहित्य व इ–साहित्याच्या स्वरुपात प्रकाशित करण्याचे प्रभावी साधन आहे. डिजीटल ग्रंथालय म्हणजे विश्वव्यापी किंवा जागतिक माहिती माहितीतंत्रज्ञानाच्या साहाय्याने नेटवर्क द्वारे जोडलेल ग्रंथालय होय.

**डिजिटायझेशन प्रक्रियेत दोन पायऱ्या आहेत :**

१) पारंपारिक स्वरुपातील साहित्याचा डिजिटल साहित्यामध्ये समावेश करणे

२) स्कॅनरच्या साहाय्याने छापील मुजकुर डिजिटल ॲक्सेस मध्ये रुपांतरित करणे

डिजिटल ग्रंथालयाची उदिष्टे :

१) वेळेची व श्रमाची बचत.

२) डिजिटल माहितीचे संग्रहण व पुर्वप्राप्ती करणे शक्य असते.

३) दुर्मिळ ग्रंथाचे जतन करुन त्याचे रुपांतर डिजिटायझेशन स्वरुपात करुन त्या ग्रंथाला सुरक्षितठेवणे शक्य होते.

४) माहिती एका ठिकाणा वरुन दुसऱ्या ठिकाणी त्वरित पाठविने शक्य होते.

५) वाचनसाहित्य डिजिटल स्वरुपात असल्यामुळे कोणत्याही ठिकाणावरुन सहज उपलब्ध होते.

६) पारंपारिकग्रंथालयापेक्षा डिजिटल ग्रंथालया सेवा अचुक व प्रभावी असतात.

७ द्ध अद्यायावत माहिती त्वरित मिळविता येते.

९) आवश्यक त्यावेळी माहिती उपलब्ध करणे शक्य होते.

१०) कमी खर्चात जास्त माहिती प्रसारीत करणे शक्य होते

११) एकाच प्रकारची माहिती अनेक वाचकांना वेगवेगळया ठिकांणि एकांचवेळी प्राप्त करुन देणे शक्य होते.

डिजिटल ग्रंथालयाची आवश्वयकता:

आजचे युग हे डिजिटल युग म्हणुन ओळखले जात आहे. पारंपारिक ग्रंथालयाच्या बदलाच्या गरजा व माहितीचे वेगाने होणारा प्रसारण यावर एक मार्ग म्हणुन डिजिटल ग्रंथालयाची आवश्वयकता भासु लागली

१) छापील माध्यमाची मर्यादा

२) वेगवेगळया स्वरुपातील साहित्याचे जतन करणे शक्य

३) जागेची समस्या दुर होते.

४) विविध भाषेतील माहिती एकत्र मिळविता येते.

५) छपाई करिता येणाऱ्या खर्चात बचत होत असल्यामुळे डिजिटल साहित्य कमी किमतीत उपलब्ध करुन देणे शक्य होते.

६) ग्रंथसंग्रहाचे जतन करण्यासाठी मुळस्वरुपातील वाचनसाहित्य डिजिटल स्वरुपात रुपांतरित करुन ठेवणे.

**डिजिटल ग्रंथालयाचे कार्य :**

१) डिजिटल ग्रंथालया द्वारे पुरविली जाणारी सेवामाहित तंत्रज्ञानामुळे वाचका पर्यत सहज पोहचविता येते.

२) आधुनिक व अधय्यावत माहितीची उपलब्धता हे डजिटल ग्रंथालयाचे मुख्य कार्य होय.

३) डिजिटल ग्रंथालयाच्या वापरास भौगोलिक मर्यादा नसल्यामुळे त्याचा कोणत्याही ठिकाणि वापरकरणे शक्य होते.

४) माहितीचा शोध अज्ञावली व सर्च इंजिन द्वारे घेता येतो.

५) डिजिटल ग्रंथालयाद्वारे माहिती हि एका ठिकाणा वरुन दुसऱ्या ठिकाणी पाठविण्याचा वेग जास्त असतो.

६)पारंपारिक ग्रंथालयापेक्षा डिजिटल ग्रंथालयाची सेवा अचुक स्पष्ट व प्रभावी असतात.

७) डिजिटल ग्रंथालयात विविध प्रकारचे डिजिटल माहितीचे स्त्रोत उपलब्ध असतात त्यात टेक्स्ट इमेज आणि दृकश्राव्य प्रकारच्या स्त्रोतांच्या समावेश असतो.

८) विविध प्रकारचे उपभोक्ते एकाच प्रकारच्या माहितीच्या स्त्रोताचा उपयोग एकाच वेळी करु शकतात

९) डिजिटल स्वरुपातील माहिती चा वापर उपभोक्तत्याच्या गरजे नुसार कधीही करु शकतो.

**डिजिटल ग्रंथालयाचे गुण :**

१) दुर्मिळ वाचनसाहित्य डिजिटल स्वरुपात तयार करुन ते वाचकापर्यत पोहचविणे शक्य होते.

२) कमी जागेत जास्त माहिती साठविणे शक्य होते.

३) अद्यायावत व अचुक माहिती मिळु शकते.

४) जागतिक स्तरावर माहितीची उपलब्धता व वापरकरणे शक्य

५) दुर्मिळ वाचन साहित्यांचे संरक्षण व सवंर्धन करणे शक्य होते

६) माहिती तंत्रज्ञानाचा परिपुर्ण वापर करुन त्वरित माहिती प्राप्त होते

७) चोवीस तास उपलब्ध

डिजिटल ग्रंथालयाची मर्यादा :

१) गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव

२) डिजिटायझेशन करिता खर्चाचे प्रमाण अधिक
३) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती चे जतन व रक्षण हे आव्हानात्मक कार्य
४) डिजिटल स्वरुपातील माहितीची किमंत निधारित करणे व गुतागुंती चे कार्य
५) हार्डवेअर किंवा सॉफ्टवेअरचे अपयश हे संपुर्ण डिजिटल ग्रंथालयाच्या कार्यक्षमते वर विपरीत परिणाम करित असतो.
६) वाचकाला माहिती स्वत: शोधवी लागते.

**निष्कर्ष :**

डिजिटल ग्रंथालय हे नविन तंत्रज्ञान हे आजच्या काळातील ग्रंथालयाना उपलब्ध केलेली एक संधी होय. म्हणून पारंपारिक ग्रंथालयाचे डिजिटल स्वरुपात रुपांतर करण`हे एक काळाची गरज बनली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या काळात ग्रंथालयामध्ये एक दोन दशका मध्ये झालेला बदलना सामोरे जावून अद्ययावत व तांत्रिक पध्दतीने ग्रंथालयाचा विकास करणेही एक काळाची गरज आहे. या डिजिटल काळात ग्रंथालयाच्या समोर असलेल्या बदलामुळे ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या भुमिकेमध्ये बदल करावा लागेल. त्याकरिता बदलले तंत्रज्ञान आत्मसात करुन वाचकांना आवश्यक असलेल्या गरजापुर्ण करण्याबाबत लक्ष दयावे लागेल इंटरनेटच्या अफाट ज्ञान सागरातुन माहिती मिळत असली तरी त्याचे योग्य मुल्यमापन करण्यासाठी अनुभवी व माहितीतंत्रज्ञानाचे ज्ञान असलेला ग्रंथालयीन कर्मचारी ग्रंथालयात असण`आवश्यक आहे.

डिजिटल ग्रंथालयाचे वैशिष्टय म्हणजे संगणकांच्या माउस वर क्लिक करुन तात्काळ माहिती मिळविता येते. इंटरनेटच्या अफाट ज्ञान सागरातुन अचुक माहिती शोधुन योग्य वाचकांला योग्य वेळी, त्वरित माहिती पुरविण्यांच`काम ग्रंथालयीन कर्मचारी करु शकतात दृमाहिती विकासाची गती मुळे पारंपारिक वाचनसाहित्याच्या माध्यमातुन सर्वदुर व त्वरित माहिती उपलब्ध होणे शक्य होत नाही याची परिणीती म्हणजे डिजिटल ग्रंथालयाचा उदय होय.

थोडक्यात अस`म्हणता येईल कि, हस्तलिखित व दुर्मिळ साहित्य डिजिटल स्वरुपात तयार करुन ती माहिती अनेक वर्ष सुरक्षित ठेवता येते. यामुळे माहितीचे संवर्धन व माहितीचे संरक्षण होते या गोष्टी डिजिटल ग्रंथालयाद्वारे शक्य होत असल्यान`डिजिटल ग्रंथालय हि एक काळाची गरज बनलीआहे.

डिजिटल ग्रंथालय हि संकल्पना आजच्या युगात मिळालेली एक वरदान आहे. डिजिटल ग्रंथालयाच्या प्रगतीला पाहता असे म्हणता येईल की भविष्य काळ हा डिजिटल ग्रंथालयाचा काळ असेल.

**संदर्भ :**

भट भारत गो (2008):इंलेक्ट्रॉनिक माहिती साधने, पिपंळापुरे बुक डिस्ट्रिटयुटरर्स, नागपूर

फडके द. ना.,(2015): ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण युनिविर्सल प्रकाशन पुणे

खेरडे मोहन, (1999): ग्रंथालय संगणकीकरणाचे मुलतत्वे, सुयोग प्रकाशन अमरावती

Hirwarde Mangala(2009): A Digital Garnthalaya, Mahitiyug.

Anandan C. (2006):Digital Libarary, Kashinhka Publication, New Delhi.

Praveen Singh, C. (2008): Digital Libraries tools & techniques, Alfa Publications, New Delhi.

Malavya V. C. (1999): Library Automation, Commonwealth Publishes, new Delhi.

AadharvhaOmesh (2010): Management of Digital library, oxford book co; Jaipur.

Shrikumar, M.G. & others (2005): Digital Libraries in knowledge processing Ess. Publication, new Delhi.